# जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीशीद्रारे कळविण्यात येते कि, प्रभाग क्र. २ चिखली मधिल गट नं. ६०६ ते गट नं. ६६३ मध्ये जागेवर सर्वसाधारणतः ७ मी. रुंदीचा खाजगी रस्ता आहे. तथापी सदर रस्त्यावरिल वाहतूक सुरळीत होणेसाठी सदर रस्त्याची रुंदी वाढविणे आवश्यक आहे. या अडीअडचणींचा विचार करुन तेथील लोकप्रतीनिधीनी सदर ठिकाणी ( प्रभाग क्र. २ चिखली गट नं. ६०६ ते ६६३ मध्ये ७ मी. रुंदीचा रस्ता आहे तो ९ मी. करणेत यावा. ) यासाठी मा. आयुक्त यांना प्राप्त अधिकारानुसार महाराष्ट्र मंहानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये याबाबत घोषणा करणेकामी क प्रभाग समितीने ठराव क्र. २६, दिनांक ०३/०१/२०१८ अन्वये मंजूर केलेला आहे. त्यास अनुसरुन आवश्यकतेनुसार मौजे चिखली येथिल गट.नं. ६०६ ते गट .नं. ६६१ मध्ये सोबतच्या नकाशात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमा चे कलम २०५ अन्वये ९.०० मी. रस्ता रुंदी घोषित करावयाची आहे.

सदर घोषीत करावयाच्या रस्त्याचा आराखडा नागरिकांच्या अवलोकनार्थ कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत महानगरपालिकेच्या नगररचना व विकास विभागात उपलब्ध करण्यात आलेला आहे.याबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत / सुचना असल्यास सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या आत आवश्यक त्या कागदपत्रांसह लेखी स्वरुपात द्यावी. सदर मुदतीत प्राप्त झालेल्या हरकती / सुचनांवर योग्य तो विचार करुन उक्त ठरावाप्रमाणे मौजे चिखली येथिल गट.नं. ६०६ ते गट .नं. ६६१ मध्ये ९.०० मी. रस्ता रुंदी घोषीत करण्यात येईल. मुदतीनंतर प्राप्त न झालेल्या कोणत्याही हरकत / सुचना विचारात घेतली जाणार नाही.

ठिकाणः- पिंपरी, पुणे
दिनांकः २१/ ०६ /२०१८

जाहिरात क्र. ३२७

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे – ४११०१८

( टिपः- सदर सुचना व नकाशा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या वेबसाईट वरही उपलब्ध आहे.)